# महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या,पुणे.

## विविध शासकीय योजना

गणेश जगदाळे,
विभागीय व्यवस्थापक,
एमसीडीसी, पुणे.

१) केंद्रिय कृषि आणि शेतकरी कल्याण मत्रांलय योजना

अ)पंतप्रधान कृषि विमा योजना (PMFBBF)

ब) मृद संवर्धन आणि सुक्ष्म पोषणमुल्ये

क) पंतप्रधान कृषि सिंचन योजना (PMSKY)

ड) राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम)

इ) परंपरागत कृषि विकास योजना (PKVY)

२) केद्रिय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय योजना

अ) मेगा फुड पार्क योजना

ब) शितसाखळी, मुल्यवर्धन आणि साठवणूक सुविधांसाठी योजना

क) शेतीमाल उत्पादन आणि पुरवठा साखळी विकास योजना

ड) अन्नप्रक्रिया आणि साठवण सुवधिा क्षमता निर्मिती / विस्तार योजना

इ) कृषि प्रक्रिया क्लस्टर साठी साधन सुविधा योजना

३) भारत सरकारच्या इतर योजना

अ) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP)

ब) सुक्ष्म आणि लघुउद्योगासाठी पतहमी निधी योजना

क) मुद्रा कर्ज योजना

ड) ॲग्री क्लिनिक ॲन्ड ॲग्री बिझनेस सेंटर (ACABC)

इ) पारंपारिक उद्योगांच्या पुर्नजिवनासाठी निधी योजना (स्फुर्ती)

ई) सुक्ष्म व लघुउद्योग क्लस्टर विकास प्रकल्प (MSE-CPD)

उ) राष्ट्रीय मंडळाची शितगृह आणि फलोत्पादन उत्पादनासाठी साठवणूक सुविधा, बांधकाम/विस्तार/आधुनिकीकरण भांडवल गुतवणूक अनुदान योजना

ऊ) लघु कृषि व्यापार संघ (SFAC) –

i) व्हेंचर कॅपिटल सहाय्य योजना

ii) शेतकरी उत्त्पादक कंपनीसाठी भांडवल अनुदान योजना.

iii) शेतकरी उत्त्पादक कंपनीसाठी पतहमी निधी योजना (CGF)

४) महाराष्ट्रातील कृषि आणि अन्नप्रक्रिया योजना

अ) मृदा आरोग्य, मृदा संवर्धन व खते संबधी योजना

ब) बियाणे संबधीत योजना –

५) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान

६)सिंचन संबधीत योजना

७)कृषि पतपुरवठा

८)फलोत्पादन

९) महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

# अ)पंतप्रधान कृषि विमा योजना (PMFBBF)

राज्यसरकारद्वारे अधिसुचित करण्यात आलेल्या धान्य, तेलबिया आाणि वार्षिक बागायती/ व्यवसायीक पिके यांना पिक विमा संरक्षण दिले जाते. सर्व शेतकऱ्यांसाठी एकसमान कमाल हप्ता भरावा लागतो.

१) खरीप हंगाम – संरक्षित रक्कमेच्या २ %

२) रब्बी हंगाम - संरक्षित रक्कमेच्या १.५ %

३) वार्षिक व्यवसायीक/बागायती पिके - संरक्षित रक्कमेच्या ५ %

अधिक माहितीसाठी संपर्क – अधिसुचित केलेल्या बॅक / सहकारी बँक/ अनुशाक्षित सामान्य विमा कंपनी तसेच जिल्हा कृषि अधिकारी / गटविकास अधिकारी

Web portal – www.agri-insurance.gov.in

# ब) मृद संवर्धन आणि सुक्ष्म पोषणमुल्ये

१९ फेब्रुवारी मृदा आरोग्य पत्रिका लागु करण्यात आली आहे.

- या योजनेअंतर्गत देशातील सर्व शेतजमिनीसाठी दोन वर्षाच्या कालातरांने मृद आरोग्यपत्रिका दिली जात आहे.

संपर्क :- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / प्रकल्प संचालक आत्मा.

# क) पंतप्रधान कृषि सिंचन योजना (PMSKY)

उददेश :-

देशातील सर्व शेतीला संरक्षित पाणी उपलब्ध करत पाणी वापर कार्यक्षमता सुधारणे हा आहे. तसेच या योजनेच्या माध्यमातून जिल्हा / राज्य स्तरावरील सर्व कक्ष नियोजन प्रक्रियेच्या अधारे सिचंन पुरवठा साखळीतील सर्व कक्ष सेवा देण्यावर धोरण राबविले जात आहे. उदा. जलस्त्रोत, वितरण प्रणाली, कार्यक्षम शेतीस्तरीय वापर, नवीन तंत्रज्ञानावरील विस्तार व सेवा आणि माहिती.

संपर्क :- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / प्रकल्प संचालक आत्मा.

# ड) राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम)

राष्ट्रीय कृषि बाजार – सुरुवात २०१५

उददेश :- विपणन क्षेत्रातील सुधारणांना चलना देऊन देशातील कृषि उत्पादनाच्या ऑनलाईन मार्केटिंगला प्रोत्साहन देऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना फायदा करुन देणे.

या योजने अंतर्गत देशभरातील निवडक २५० बाजार समितीमध्ये वेब अधारित प्लॅटफॉम विकसीत करण्यात आला आहे. यामुळे बाजारपेठेच्या संपुर्ण कार्याचे डिजीटायझेशन, शेतमाल प्रवेश गट (गेट एन्ट्री लॉट), ई-विक्रीकरार , ई-पेमेंट प्रणाली

संपर्क :- www.agmarknet.nic.in

www.enam.gov.in

# इ) परंपरागत कृषि विकास योजना (PKVY)

## उददेश :-

पर्यावरणपुरक, कमीखर्चातील तंत्रज्ञानाचा अवलंब करुन रसायने आणि किटकनाशकांच्या अवशेषापासून मुक्त कृषि उत्पादन घेणे म्हणेज सेंद्रिय शेती होय.

## निकष :-

१) सेंद्रिय शेतीसाठी निवडले जाणारे क्लस्टर हे किमान ५० एकर क्षेत्र असावे.

२)एका शेतकऱ्यासाठी कमाल १ हेक्टर आणि एकुण ५० एकराच्या हेक्टरसाठी शेतकऱ्यांना कमाल १० लक्ष अनुदान दिले जाते.

संपर्क :- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / प्रकल्प संचालक आत्मा.

# २) केद्रिय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय योजना (MOFPI)

## अ) मेगा फुड पार्क योजना

**उददेश:-** शेतकरी, प्रक्रियादार, किरकोळ विक्रेता यांना एकत्र आणत बाजार व्यवस्था आणि कृषि उत्पादन यांना जोडण्यासाठी एक यंत्रणा उभी करणे. (मुल्यवर्धन,शेतमालाची नासाडी कमी करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे व रोजगाराच्या संधी वाढ करणे.)

**अर्थसहाय्य स्वरुप** :- पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५% आणि डोंगराळ प्रदेशामध्ये प्रकल्प खर्चाच्या ५०%

**पात्रता निकष** :- १)प्रवर्तक / अंमलबजावणी यंत्रणा यांचे एकत्रित निवळ मुल्य (नेट वर्थ) अनुदान रक्कमेच्या १.५ पटीपेक्षा कमी नसावे.  २) किमान क्षेत्र १० एकर एकुण २५ कोटी गुंतवणुकीचे किमान ५ प्रक्रिया प्रकल्प उभारणीचा प्रस्ताव.

**अपात्र खर्च घटक** :- जमिनीची किंमत, उत्पादन पुर्व खर्च आणि खेळते भागभांडवलासाठी सिमांत रक्कम ग्राहय धरली जात नाही. मेगा फुडपार्कचे प्रवर्तक पात्र ठरणार नाहीत.

**पात्र संस्था :-** शासनाच्या सर्व कार्यान्वयीन यंत्रणा संस्था/सार्वजनिक संस्था/संयुक्त उपक्रम/ स्वंयसेवी संस्था/ सहकारी संस्था/ स्वंयसाहय्यता गट/खाजगी क्षेत्र/वैयक्तीक व्यवसायीक पात्र असतील.

**संपर्क :-** केंद्रिय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय नवी दिल्ली.
फोन नं-०११-२६४९२२१६/२६४९२१७४/२६४९३२२७/२६४९०९३३

# ब) शितसाखळी, मुल्यवर्धन आणि साठवणूक सुविधांसाठी योजना

**उददेश:**- शेतीप्रदेश ते ग्राहक अशी एकात्मीक शितसाखळी आणि साठवणुक सुविधांचा विकास करणे.

फलोत्पादन ,सेंद्रिय शेतीमाल, मत्स्य उत्पादने, डेअरी , मांस उत्पादने आणि पोल्ट्री उत्पादने प्रदेशाजवळ प्री-कुलींग सुविधा, मोबाईल कुलींग सुविधा तसेच प्रक्रिया आणि शेती उत्पादन केंद्र अशी मुल्यवर्धन केद्र उभारण्यास प्रोत्साहन दिले जाते.

**अर्थसहाय्य स्वरुप** :- एकुण प्रकल्प आणि यंत्रसामुग्री खर्च तसेच तांत्रिक बाधकाम खर्च याबाबत सामान्य प्रदेशासाठी प्रकल्प खर्चाच्या ३५% आणि ईशान्य भारत /दुर्गम प्रदेशासाठी प्रकल्प खर्चातील साठवणूक सुविधासाठी ५०% आणि प्रक्रिया सुविधासाठी ७५%

**पात्रता निकष** :- १)अर्जदाराचे निव्वळ मुल्य (नेटवर्थ) अनुदान रक्कमेच्या १.५ पटीपेक्षा कमी नसावे २) प्रकल्प खर्चाच्या किमान २०% अर्थसहाय्य बॅक किंवा वित्तीय संस्थेकडून कर्ज स्वरुपात घेणे गरजेचे. ३) व्यवसायीक उत्पादन प्रारंभींची तारीख ही अर्ज सादर करण्याच्या तारखेच्या आधीची नसावी.

**पात्र घटक** :- १) वजन, वर्गीकरण, प्रतवारी, व्हॅक्सींग, पॅकींग, प्री-कुलींग सुविधा २) रेफर वाहतूक ३) वितरण केंद्र – इंडिव्युजअल क्विक फिंजींग व ब्लास्ट फिंजींग

**अपात्र खर्च घटक :**- जमिनीची किंमत, उत्पादन पुर्व खर्च आणि खेळते भागभांडवलासाठी सिमांत रक्कम ग्राहय धरली जात नाही.

**पात्र संस्था** :- शासनाच्या सर्व कार्यान्वयीन यंत्रणा संस्था/सार्वजनिक संस्था/संयुक्त उपक्रम/ स्वंयसेवी संस्था/ सहकारी संस्था/ स्वंयसाहय्यता गट/खाजगी क्षेत्र/वैयक्तीक व्यवसायीक पात्र असतील.

**संपर्क** :- केंद्रिय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय नवी दिल्ली.
फोन नं-०११-२६४९२२१६/२६४९२१७४/२६४९३२२७/२६४९०९३३

# क) शेतीमाल उत्पादन आणि पुरवठा साखळी विकास योजना

**उददेश**:- अन्नप्रक्रिया उद्योगासाठी पुरवठा साखळीतील त्रुटी कमी करत कच्चामाल सुलभपणे उपलब्ध करण्यासाठी सर्व घटकांना जोडणे आणि प्रक्रियायुक्त मालासाठी बाजारजोडणी करणे.

**अर्थसहाय्य स्वरुप** :- शेतकरी उत्पादक संस्थासाठी सामान्य प्रदेशासाठी प्रकल्प खर्चाच्या ३५% कमाल ५ कोटी व दुर्गम भागासाठी ५०% अनुदान दिले जाते.

**पात्रता निकष** :- १)अर्जदाराचे निव्वळ मुल्य (नेटवर्थ) अनुदान रक्कमेच्या १.५ पटीपेक्षा कमी नसावे २) प्रकल्प खर्चाच्या किमान २०% अर्थसहाय्य बॅक किंवा वित्तीय संस्थेकडून कर्ज स्वरुपात घेणे गरजेचे. ३) व्यवसायीक उत्पादन प्रारंभींची तारीख ही अर्ज सादर करण्याच्या तारखेच्या आधीची नसावी.

**पात्र घटक** :- अ) उत्पादन साखळी - एकात्मिक पॅकहाऊस, दुध शितकरण केंद्रे, प्रि-कुलींग प्रकल्प, मोबाईल प्रि-कुलींग व्हॅन, रेफर बोट ब) पुरवठा साखळी – पिकवन कक्ष, फ्रोजन स्टोरेज, रिटेल रेफरिजेरेटर कार्ट, क) वाहतूक – रेफ्रिजेरेटेड इन्सुलेटेड वाहतूक सुविधा.

**अपात्र खर्च घटक** :- जमिनीची किंमत, उत्पादन पुर्व खर्च आणि खेळते भागभांडवलासाठी सिमांत रक्कम ग्राहय धरली जात नाही.

**पात्र संस्था** :- कार्यरत असलेल्या अन्नप्रक्रिया प्रकल्पाचे प्रवर्तक, प्रक्रियायुक्त अन्न विक्रेते, लोजिस्टिक सेवा पुरवठादार आणि अन्न प्रक्रिया प्रकल्पाशी संबधींत सार्वजनिक संस्था/संयुक्त उपक्रम/ स्वंयसेवी संस्था/ सहकारी संस्था/ स्वंयसाहय्यता गट/खाजगी क्षेत्र/वैयक्तीक व्यवसायीक पात्र असतील.

**संपर्क** :- केंद्रिय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय नवी दिल्ली.
फोन नं-०११-२६४९२२१६/२६४९२१७४/२६४९३२२७/२६४९०९३३

## ड) अन्नप्रक्रिया आणि साठवण सुवधिा क्षमता निर्मिती / विस्तार योजना

**उददेश**:- अन्नप्रक्रिया उद्योगांना प्रक्रिया स्तरावरील सुधारणानुसार आधुनिकीकरण/ विस्तार करणे, मुल्यवर्धनातून नुकसान-नासाडी कमी करणे यास प्रोत्साहन दिले जाते.

नवीन प्रकल्पाची स्थापना करणे आणि विद्यमान प्रकल्पाची आधुनिकीकरण / विस्तार करणे.

**अर्थसहाय्य स्वरुप** :- शेतकरी उत्पादक संस्थासाठी सामान्य प्रदेशासाठी प्रकल्प खर्चाच्या ३५% कमाल ०.७५ दशलक्ष डॉलरच्या मर्यादेत व दुर्गम भागासाठी ५०% अनुदान दिले जाते.

**पात्रता निकष** :- १) अर्जदाराचे / प्रवर्तकाचे भांडवल प्रकल्प खर्चाच्या २०% पेक्षा कमी नसावे. २) प्रकल्पातील पात्र घटकावरील खर्च ३ कोटीपेक्षा जास्त असावा. ३) बॅक किंवा वित्तीय संस्थेकडून कर्ज मंजुर असलेल्या प्रकल्पाचेच प्रस्ताव या योजनेसाठी पात्र असतील. ४) व्यवसायीक उत्पादन प्रारंभींची तारीख ही अर्ज सादर करण्याच्या तारखेच्या आधीची नसावी.

**अपात्र खर्च घटक** :- जमिनीची किंमत, उत्पादन पुर्व खर्च आणि खेळते भागभांडवलासाठी सिमांत रक्कम ग्राहय धरली जात नाही.

**पात्र संस्था** :- अन्न प्रक्रिया प्रकल्पाशी संबधींत शासनाच्या सर्व कार्यान्वयन यंत्रणा/ संस्था/सार्वजनिक संस्था/संयुक्त उपक्रम/ स्वंयसेवी संस्था/ सहकारी संस्था/ स्वंयसाहय्यता गट/खाजगी क्षेत्र/वैयक्तीक व्यवसायीक पात्र असतील.

**संपर्क** :- केंद्रिय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय नवी दिल्ली.

फोन नं-०११-२६४९२२१६/२६४९२१७४/२६४९३२२७/२६४९०९३३

# इ) कृषि प्रक्रिया क्लस्टर साठी साधन सुविधा योजना

**उददेश:-** आधुनिक पायाभुत सुविधाच्या विकासाला चलना देत उद्योजक, व्यवसायीकांच्या समुहाला क्लसटर आधारित अन्न प्रक्रिया प्रकल्प उभारणीस प्रोत्साहन देणे हा आहे.

प्रभावी उत्पादन आणि पुरवठासाखळी विकसीत करुन उत्पादक/ शेतकऱ्यांच्या गटांना / प्रक्रियादार व बाजारांना जोडलेल्या सुसज्य पुरवठा साखळीद्वारे जोडले जाते.

शेतमाल उत्पादन क्षेत्राजवळच आधुनिक प्रक्रिया सुविधा, एकात्मिक/ सर्व कक्ष साठवणुक सुविधा उभ्या करुन शेतकरी ते ग्राहक जोडले जाते.

अर्थसहाय्य स्वरुप :- शेतकरी उत्पादक संस्थासाठी सामान्य प्रदेशासाठी प्रकल्प खर्चाच्या ३५% कमाल १.५० दशलक्ष अमेरिकन डॉलरच्या मर्यादेत व दुर्गम भागासाठी ५०% अनुदान दिले जाते.

**पात्रता निकष** :- १) प्रवर्तक / अंमलबजावणी यंत्रणा यांचे एकत्रित मिळून निव्वळ मुल्य (नेटवर्थ) अनुदान रक्कमेच्या १.५ पटीपेक्षा कमी नसावे. २) अंमलबजावणी संस्थेने एकुण प्रकल्प खर्चाच्या किमान २०% रक्कम भागभांडवलाच्या माध्यमातून जमवणे आवश्यक आहे. ३) किमान जमीन क्षेत्र १० एकर. एकुण २५ कोटी गुतंवणुकीची किमान प्रक्रिया प्रकल्प उभारणीचा प्रस्ताव.

**अपात्र खर्च घटक** :- जमिनीची किंमत, उत्पादन पुर्व खर्च आणि खेळते भागभांडवलासाठी सिमांत रक्कम ग्राहय धरली जात नाही व मेगा फुडपार्कचे प्रवर्तक पात्र ठरणार नाही.

**पात्र संस्था** :- अन्न प्रक्रिया प्रकल्पाशी संबधींत शासनाच्या सर्व कार्यान्वयन यंत्रणा/ संस्था/सार्वजनिक संस्था/संयुक्त उपक्रम/ स्वंयसेवी संस्था/ सहकारी संस्था/ स्वंयसाहय्यता गट/खाजगी क्षेत्र/वैयक्तीक व्यवसायीक पात्र असतील.

**संपर्क** :- केंद्रिय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय नवी दिल्ली.

फोन नं-०११-२६४९२२१६/२६४९२१७४/२६४९३२२७/२६४९०९३३

# ३) भारत सरकारच्या इतर योजना

## अ) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP)

**उददेश**:-नवीन स्वंयरोजगार उपक्रम/ प्रकल्प / सुक्ष्म उद्योग स्थापित करुन देशाच्या ग्रामिण तसेच शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

पारंपारीक कारागीर/ ग्रामिण आणि शहरी बेरोजगारांना युवकांना एकत्र आणने आणि त्यांना शक्य त्या प्रकारे स्वंय रोजगाराच्या संधी देणे.

**अर्थसहाय्य स्वरुप :-**

| पीएमईजीपी अंतर्गत लाभार्थी श्रेणी | लाभार्थी योगदान (प्रकल्प खर्चामधील) | अनुदान दर (प्रकल्प खर्चावर आधारित) | |
|---|---|---|---|
| प्रदेश (प्रकल्प स्थळ) | | शहरी | ग्रामिण |
| सामान्य श्रेणी | 10 % | 15 % | 25 % |
| विशेष ईशान्य भारत, डोंगराळ आणि सिमावर्ती प्रदेश | 5 % | 25 % | 35 % |

**पात्रता निकष** :- १. उत्पादन क्षेत्रासाठी प्रकल्पाची कमाल किंमत २५ लाख रु.

२. व्यवसाय / सेवा क्षेत्रा अंतर्गत प्रकल्पाची कमाल किंमत १० लाख रु.

३. प्रकल्प खर्चातील उर्वरित रक्कम बॅकेद्वारे प्रदान केली जाईल.

**ईडीपी प्रशिक्षण** – लाभार्थ्यास ईडीपी प्रशिक्षण बंधनकारक रु.५ लक्ष प्रकल्पासाठी ०६दिवसांचे प्रशिक्षण आणि रु.५ ते २५ लक्ष प्रकल्पासाठी १० दिवसांचे प्रशिक्षण

**पात्र संस्था :-** वैयक्तिक उद्योजक संस्था/ सहकारी संस्था/ सार्वजनिक संस्था/संयुक्त उपक्रम/ स्वंयसेवी संस्था/ सहकारी संस्था/ स्वंयसाहय्यता गट/खाजगी क्षेत्र/वैयक्तीक व्यवसायीक पात्र असतील.

**संपर्क :-** राज्य संचालक/ खादी ग्रामोद्योग महामंडळ (KVIC)

www.kviconline.gov.in

फोन नं-०२२-२६७१४३७०

# ब) सुक्ष्म आणि लघुउद्योगासाठी पतहमी निधी योजना

**उददेश:**- सुक्ष्म आणि लघुउद्योग क्षेत्रांना उपलब्ध संपार्षिक-मुक्त पुरवठा करण्याच्या उददेशाने योजना सुरु केली आहे. शेतकरी उत्पादक कंपनीसही विद्यमान आणि नवीन उद्योग दोन्ही या योजनेअंतर्गत समाविष्ठ केले जाऊ शकते.

पात्र कर्ज संस्था :- व्यवसायिक बँका (सार्वजनीक/ खाजगी/विदेशी), निवडक ग्रामिण बॅका. इतर ९ संस्था उदा. दिल्ली वित्तमहामंडळ, केरळ वित्तमहामंडळ, सीडबी.

**हमी सुरक्षा** :- सुक्ष्म आणि लघुउद्योग प्रकल्पासाठी १०० लाख पर्यत खेळते भागभांडवल कर्ज आणि/ किंवा मुदत कर्ज मिळू शकेल. कोणत्याही संपवार्षिक सुरक्षेशिवाय आणि त्रयस्त पक्ष हमीशिवाय या योजनेअंतर्गत वित्त सहाय्य दिले जाते.

**हमी प्रमाण** :- पतसुविधा मंजुर झालेल्या रक्कमेच्या कमाल ८५% पर्यत पतहमी लागू आहे. ५० लाखपर्यंत कर्जपुरवठा मर्यादेच्या हमीप्रमाण ७५% पर्यंत पतहमी आणि ५० ते१०० लाख यांच्या रक्क्मेसाठी समान ५०% हमी असेल.

लाभार्थी प्रकल्प कर्जफेड करण्यास सक्षम राहिला नाही तर ट्रस्टद्वारे कर्ज रक्क्मेच्या ७५% पर्यत जबाबदारी पेलली जाते.

**हमी कालावधी** :- मुदत कर्ज / समिश्र कर्जाच्या मान्य कालावधीसाठी आहे. खेळत्या भागभांडवलाबाबत हमी कालावधी ५ वर्षाचा असतो.

**हमीसाठी शुल्क** :- समिश्र सर्व वार्षिक हमीशुल्क हे मंजुर पतसुविधेच्या वार्षिक १% एवढे आकारले जाते आणि महिला उद्योजक , सुक्ष्म प्रकल्प रक्कम रु. ५ लाख ते १०० लाख रु.च्या कर्ज सुविधेसाठी ०.८५% एवढे आकारले जाते

संपर्क :- MSME मंत्रालय, नवी दिल्ली

ई-मेल आयडी :- adc1@dcmsme.gov.in

फोन नं – 011-23062694

# क) मुद्रा कर्ज योजना

मुद्रा कर्ज योजनेची सुरुवात ८ एप्रिल २०१५ रोजी झाली.

बँक, बिगर बँकिंग वित्त संस्था (NBFC), सुक्ष्म वित्त संस्था (MFSI) आणि मुद्रा लि.द्वारे अधिसुचित इतर मान्यता प्राप्त वित्त संस्था यांच्या माध्यमातून मुद्रा कर्ज दिले जाते.

- या योजनेद्वारे उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील सुक्ष्म व्यवसायांना १० लाखापर्यंतचे कर्ज दिले जाते.

मुद्रा कर्ज पुढील तीन श्रेणीमध्ये दिले जाते.

- ५०००० रुपयापर्यंत (शिशु)
- ५०००१ ते ५ लाखपर्यंत (किशोर)
- ५००००१ ते रुपये १० लाखपर्यंत (तरुण)

**पात्र कर्जदार** – व्यक्ति, व्यवसायीक संस्था (FPO), भागीदारी फर्म, खाजगी मर्यादित कंपनी, सार्वजनिक कंपनी, इतर कोणत्याही कायदेशीर संस्था.

सहाय्य उददेश/ स्वरुप :- उत्पादन,प्रक्रिया,सेवा क्षेत्र किंवा व्यापारातील लहान व्यवसाय उपक्रम निर्मितीसाठी कर्जाची तरतुद करणे.

**व्याजदर** :- बँकेच्या धोरणानुसार आकारला जातो.

**सुरक्षा** :- भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या मास्टर सक्युलेशनमधील मार्गदर्शक तत्वानुसार सुक्ष्म-लघु- मध्यम उद्योगाला १० लाख रु.पर्यत कर्ज पुरवठा करण्यासाठी बँकांना संपाव्षिक सुरक्षा मागणी बंधनकारक नाही.

**सहाय्य कालावधी** :- कमाल ३६ महिने

**परतफेड** – मुदत कर्ज व्यवसायातील उत्पन्न स्तराचे प्रमाण पाहून योग्य अधिस्थगन कालावधीसह योग्य हप्त्यामये परतफेड करणे योग्य.

**संपर्क** :- मुद्रा बँक

ई-मेल आयडी :- missionmudra-dfs@nic.in

फोन नं – 011-23748765

## ड) ॲग्री क्लिनिक ॲन्ड ॲग्री बिझनेस सेंटर (ACABC)

**उददेश :-** शेतकऱ्यांना माती आरोग्यासह, पिक पध्दती, वनस्पती संरक्षण, पिक विमा, काढणी पश्चात तंत्रज्ञानासह आणि क्लिनीक सेवासह विविध तंत्रज्ञानाबाबत विशेषज्ञ सल्ला आणि सेवा पुरविण्याबाबत अॅग्री क्लिनिकची संकल्पना विकसीत करण्यात आलेली आहे.

उदा. कस्टम हायरींग सेवा, निविष्ठा विक्री आणि शेतीपुरक क्षेत्रातील इतर सेवा, काढणी पश्चात व्यवस्थापन आणि बाजार जोडणी व्यवसायाचा समावेश होतो.

**सुधारित प्रशिक्षण खर्च** :- रुपये ३५०० प्रति प्रशिक्षणार्थी आहे.

अर्थसहाय्य :- या योजनेअंतर्गत मदत पुर्णपणे कर्जाशी बॅक जोडणी (केडीट लिंकेज) नुसार दिली जाते आणि आर्थिक व्यवहार्यता आणि व्यवसायीक विचारावर आधारित बॅकेद्वारे प्रकल्प मंजुरीच्या अधीन राहील.

**प्रकल्प खर्च मर्यादा** :- अनुदानासाठी प्रकल्प खर्चाची कमाल मर्यादा

वैयक्तिक प्रकल्पासाठी २० लाख

समुह प्रकल्पासाठी १०० लाख रु. (या योजनेअंतर्गत किमान ५ प्रशिक्षीत व्यक्तींचा आलेल्या गटाची स्थापना, ज्यापैकी एकाची पाश्वभुमी व्यवस्थापन क्षेत्रातील असु शकते)

भांडवल आणि व्याजावर अनुदानाऐंवजी संमिश्र अनुदान पध्दती :-

मधील उमेदवार व अनुसुचीत जाती / जमाती इंशान्य भारत ४४% सर्व इतरासाठी प्रकल्प खर्चाच्या ३६ % मर्यादित अनुदान दिले जाते.

संपर्क :-
वेबसाईठ:- manage.gov.in
फोन नं –

## इ) पारंपारिक उद्योगांच्या पुर्नजिवनासाठी निधी योजना (स्फुर्ती)

**ओळख :-**पारंपारिक उद्योग व कारागीर यांना स्पर्धात्मक बनविण्यासाठी आणि त्यांच्या दिर्घकालीन शाश्वतीसाठी आणि वाढीसाठी आर्थिक मदत करणे. व्यवसायीकांना शाश्वत रोजगार संधी उपलब्ध करणे.

व्यक्तिमत्व विकास उपक्रम :- जागृकता, समुपदेशन,कौशल्य विकास आणि क्षमतावंर्धन या बाबतचे प्रशिक्षण व कार्यशाळा.

कौशल्य विकास उपक्रम :- सामुहिक सुविधा केंद्रे (CFC), कच्चामाल बॅक (RMD), उत्पादन पायाभुत सुविधा उभारणे,गोदाम सुविधा, मुल्यवर्धन व प्रक्रिया केंद्र

संकल्पनात्मक उपक्रम :- ब्रॅन्ड विकास आणि प्रसिध्दी, नवीन माध्यमावर मार्केटींग, ईकॉमर्स उपक्रम, नाविन्यपुर्ण उपक्रम अशा संकल्पनात्मक उपक्रमांचा समावेश करता येतो.

कोणत्याही विशिष्ट प्रक्लपासाठी प्रदान करण्यात आलेली आर्थिक मदत कमाल ८ कोटी रु. असेल.

**क्लस्टरचे प्रकार :-**

वारसा क्लस्टर (१००० ते २५०० कारागीर) – कमाल सहाय्य मर्यादा रु.८ कोटी

प्रमुख क्लस्टर (५०० ते १००० कारागीर) – कमाल सहाय्य मर्यादा रु.३ कोटी

छोटे क्लस्टर (५०० कारागीरापर्यंत ) – कमाल सहाय्य मर्यादा रु.१.५ कोटी

## इ) पारंपारिक उद्योगांच्या पुर्नउत्पादनासाठी निधी योजना (स्फुर्ती)

योजने अतर्गत निधी वितरणाचे स्वरुप खालील प्रमाणे :-

| अनु क्रं. | प्रकल्प उपक्रम | योजना निधी | वित्त मर्यादा | अंमलबजावणी संस्थेचा वाटा |
|---|---|---|---|---|
| अ | क्लस्टर उपक्रम | - | - | - |
| अ - १ | व्यक्तिमत्व विकास उपक्रम | १००% | एकुण क्लस्टर उपक्रम खर्चाच्या ३३% किंवा २५ लाख पैकी जे कमी असेल ते | निरंक |
| अ - २ | कौशल्य प्रशिक्षण | ७५% | - | जमीन किंमत, स्वनिधी भागभांडवल म्हणून प्रकल्प खर्चाच्या २५% |
| ब | टीए खर्च | १००% | अ १+ अ २ च्या ८% | निरंक |
| क | सीडीईसह अंमलबजावणी संस्था/ एसपीव्ही यांचा खर्च | १००% | कमाल २० लाख रु. प्रति प्रकल्प | निरंक |

संपर्क :- सुक्ष्म ,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली.

वेबसाईठ:- www.msme.gov.in

फोन नं – 011-23061431

## ई) सुक्ष्म व लघुउद्योग क्लस्टर विकास प्रकल्प (MSE-CPD)

**ओळख :-** सुक्ष्म व लघुउद्योगांची उत्पादक्ता आणि स्पर्धात्मक्ता वाढविण्यासाठी देशातील समुहांचे क्लस्टर आधारित विकास करण्याचे धोरण.

क्लस्टर म्हणजे एखादया समान आणि तत्सम उत्पादने/ सेवा निर्माण करणाऱ्या परिचीत आणि जवळच्या उद्योग, व्यवसायीकांचा समुह.

क्लस्टर मधील उद्योगांची आवश्यक वैशिष्टये :-

अ) उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण व चाचणी, ऊर्जेचा वापर, प्रदुषण नियंत्रण – समानता व पुरकता

ब) तंत्रज्ञान आणि विपणन धोरण समान स्तर

क) क्लस्टरच्या सदस्यामध्ये संम्पेक्षणासाठी समान माध्यम/पर्याय

ड) सामान्य आव्हाने आणि संधी

**उदिदष्टे :-** १) तंत्रज्ञान, कौशल्य आणि गुणवत्ता सुधारणे, बाजारपेठेची उपलब्धता यागरजा एसएमई वाढीसाठी प्रोत्साहन

२) एसएमईच्या नवीन / विद्यमान औद्योगिक क्षेत्र पायाभुत सुविधांची निर्मिती /सुधारणा करणे.

३) एसएमईची क्षमता वाढविणे.

**पात्र घटक :-** १) सामुहिक सुविधा केंद्राची उभारणी करणे – प्रकल्प खर्चाच्या ७०% किंवा १५ कोटी कमाल मर्यादा.

२) पायाभुत सुविधा विकास :- विद्यमान औद्योगिक वसाहत / परिसरमधील पायाभुत सुविधा विकासासाठी प्रकल्प खर्चाच्या ६०% किंवा १० कोटी कमाल मर्यादा.

**संपर्क :-** www.cluster.dcmsme.gov.in

फोन क्रं :- ०११-२३०६२५६१

## उ) राष्ट्रीय मंडळाची शितगृह आणि फलोत्पादन उत्पादनासाठी साठवणूक सुविधा, बांधकाम/विस्तार/आधुनिकीकरण भांडवल गुतवणूक अनुदान योजना

**पात्र घटक :-** नियंत्रीत वातारवणातील सुविधासह शितगृहे आणि त्यांच्या आधुनिककीकरणाशी संबंधीत प्रकल्प (credit linked)

**सहाय्य स्वरुप :-** साठवणूक क्षमता ५ हजार मे.टन ते १० हजार मे.टन प्रकल्प खर्चाच्या सर्वसाधारण प्रदेशासाठी ३५% पर्यंत, ईशान्य भारत, पर्वतीय प्रदेशसाठी प्रकल्प खर्चाच्या ५०% पर्यंत अर्थसहाय्य

**अटी :-** प्रकल्प खर्चासाठी निधीस्त्रोत बॅक किंवा बिगर बॅंकिंग वित्त संस्थेचे मुदत कर्ज असू शकते. एनएचबी अंतर्गत केडीट लिंकड अनुदानासाठी पात्र अनुदानाची रक्कम कर्ज देणाऱ्या बॅंक/ वित्तीय संस्थांच्या कर्ज प्रमाण मंजुरीच्या मर्यादेत राहिल.

**पात्र संस्था :-** वैयक्तिक उद्योजक संस्था/ सहकारी संस्था/ सार्वजनिक संस्था/संयुक्त उपक्रम/ स्वंयसेवी संस्था/ सहकारी संस्था/ स्वंयसाहय्यता गट/खाजगी क्षेत्र/ पात्र असतील.

**संपर्क :-** राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ, एमसीएईआर,भांबुर्डा, भोसलेनगर,पुणे.
फोन क्रं :- ०२०-२५५३०५८२
Email – nhbpune@gmail.com

# ऊ) लघु कृषि व्यापार संघ (SFAC)

**व्हेंचर कॅपीटल योजना :-** शेती व्यवसाय प्रकल्पांसाठी  कमी व्याजदराने (soft loan) स्वरुपात भांडवल उपलब्ध करते. प्रकल्प खर्चासाठी आवश्यक खर्च आणि वित्तीय संस्थेने मंजूर केलेले मुदत कर्ज यामधील फरक या कर्जाच्या माध्यमातून खालील अटीनुसार उपलब्ध केला जातो.

**व्हेंचर कॅपीटल पात्र प्रकल्प** :-

१)कृषि वकृषिपुरक क्षेत्र किंवा सेवा निगडीत असावा.

२) शेतकऱ्यांना बाजारसुवधिा उपलब्ध झाली  पाहिजे.

३) मुदत कर्ज मंजुर करण्यासाठी वित्तीय संस्थेने प्रकल्प स्विकारलेला असावा.

**अनुदान** :-  प्रर्वतक भांगभाडवल – २६%  किंवा कमाल ५० लक्ष यापैकी कमी असेल ते.

**पात्र घटक** :- वैयक्तिक उद्योजक संस्था/ सहकारी संस्था/ सार्वजनिक संस्था/संयुक्त उपक्रम/ स्वंयसेवी संस्था/ सहकारी संस्था/ स्वंयसाहय्यता गट/खाजगी  क्षेत्र/  प्राधान्य क्रम शेतकरी उत्पादक कंपनी पात्र असतील.

**संपर्क :-** लघु कृषि व्यापार संघ , नवी दिल्ली.

www.sfacindia.com

फोन क्रं :- ०११-२६८६२३६७

## ऊ) लघु कृषि व्यापार संघ (SFAC)

**शेतकरी उत्पादक कंपन्यासाठी भांडवल अनुदान योजना :-** नव्याने स्थापीत झालेल्या शेतकरी उत्पादक कंपन्या ज्याचे संकलीत भागभांडवल ३० लाख रु.पेक्षा अधिक नाही अशा शेतकरी उत्पादक कंपन्यांना १० लाख रु.मर्यादीत २ हप्त्यामध्ये उपलब्ध केली जाते.

**पात्रता मापदंड शेतकरी उत्पादक कंपनीसाठी** :-

अधिकृतरित्या नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी

वैयक्तिक भागधारकांची संख्या ५० पेक्षा कमी नाही.

एकुण समभागधारकांच्या संख्येपैकी किमान ३३% शेतकरी सुक्ष्म, लघु व अल्पभुधारक असावे.

एका सदस्यांची कमाल भागधारणा शेतकरी उत्पादक कंपनीच्या एकुण भागभांडवलाच्या ५% पेक्षा कमी नसावी.

किमान १८ महिन्याचा व्यवसाय आराखडा.

किमान १ वर्षाचे लेखापरिक्षण पुर्ण.

संस्थात्मक सदस्याची कमाल भागधारणा शेतकरी उत्पादक कंपनीच्या एकुण भांडवलाच्या १०%पेक्षा जास्त नसावी.

**संपर्क :-** लघु कृषि व्यापार संघ , नवी दिल्ली.

www.sfacindia.com

फोन क्रं :- ०११-२६८६२३६७

## ऊ) लघु कृषि व्यापार संघ (SFAC)

**शेतकरी उत्त्पादक कंपनीसाठी पतहमी निधी योजना (CGF) :-**

शेतकरी उत्पादक कंपन्याना संमपार्षित मुक्त कर्ज उपलब्ध करावे आणि त्याद्वारे कर्जातील जोखीम कमी करावी यासाठी वित्त संस्थांना पतहमी सुरक्षा देण्याच्या उददेशाने या योजनेची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये १०० लाखापर्यंतचे कर्ज देण्यात येते.

**पात्रता मापदंड शेतकरी उत्पादक कंपनीसाठी** :-

अधिकृतरित्या नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी

वैयक्तिक भागधारकांची संख्या ५०० पेक्षा कमी नाही.

एकुण समभागधारकांच्या संख्येपैकी किमान ३३% शेतकरी सुक्ष्म, लघु व अल्पभुधारक असावे.

एका सदस्यांची कमाल भागधारणा शेतकरी उत्पादक कंपनीच्या एकुण भागभांडवलाच्या ५% पेक्षा कमी नसावी.

किमान एक महिला प्रतिनिधी संचालक असावी.

किमान १८ महिन्याचा व्यवसाय आराखडा.

किमान १ वर्षाचे लेखापरिक्षण पुर्ण.

संस्थात्मक सदस्याची कमाल भागधारणा शेतकरी उत्पादक कंपनीच्या एकुण भांडवलाच्या १०%पेक्षा जास्त नसावी.

वित्तसंस्थेने हमी निधीसाठी अर्ज केल्यापासून ६ महिन्याच्या आत किंवा तत्वता लिखीत मान्यतेनुसार /लिखीत इच्छा व्यक्त केली आहे की ती मुदत कर्ज/खेळते भांडवल/ संमिश्र पत पुरवठा कोणत्याही संपार्षिक सुरक्षेविना किंवा त्रयस्थ पक्ष हमी (संचालकांच्या वैयक्तिक हमीसह) शिवाय मंजुर करण्यास मान्यता दिली आहे.

**संपर्क :-** लघु कृषि व्यापार संघ , नवी दिल्ली.

www.sfacindia.com

फोन क्रं :- ०११-२६८६२३६७

# गटशेतीस प्रोत्साहन व सबलीकरण करण्यासाठी शेतकऱ्यांचे गटशेतीस चालना देणे :-

## गट समूहाची निवड व पात्रता –

- सलग क्षेत्र असलेला समूह
- समूहात किमान २० ते १०० एकर क्षेत्र असलेला शेतकरी संख्या .
- ज्या ठिकाणी पॉलिहाऊस शेडनेट माध्यमातून गट निर्माण होतो त्या ठिकाणी क्षेत्र मर्यादा २५ एकर एका गटासाठी राहील. ४ गटांचा एक समूह राहील .
- आत्मा संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था , अधिनियम १९६०, कंपनी अधिनियम १९५८ अंतर्गत शेतकरी गट उत्पादक कंपनीची नोंदणी केलेली असावी .

- **शेतकरी गट समूह निवड निवड करताना प्राधान्यक्रम निकष :-** शेतकरी गटाने या योजनेअंतर्गत तयार केलेल्या आराखड्यास बँकेमार्फत कर्ज मिळणार असले बाबत करार केला असेल तर, किंवा घाऊक विपणन कंपन्यांसोबत उत्पादन विक्री व्यवस्थेच्या मूल्य साखळी बाबतचा करार केला असेल असे उत्पादक गट.
- गट समूहाकडे शेती समवेत इतर पूरक व्यवसाय आहेत असे समूह. अशा गटांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे वृत्तपत्रात जाहिरात आल्यानंतर अर्ज करावा .
- या योजनेत प्रचलित योजनेच्या व्यतिरिक्त एकूण **१ कोटींच्या** मर्यादेत अनुदान उपलब्ध होऊ शकते . अनुदान जमीन सुधारणा ,समतलीकरण, सामूहिक सिंचन व्यवस्था, उदा. बोअरवेल, शेततळे, पाइपलाइन सोलर पंप यांत्रिकीकरण व तंत्रज्ञानाच्या अंतर्गत -नवीन यंत्र खरेदी करणे शेड बांधकाम करणे इ साठी अनुदान मिळेल

तसेच सामूहिक संकलन प्रतवारी साठवणूक प्रक्रिया केंद्राच्या निर्मितीसाठी सुद्धा अनुदान देय राहील .

- **विपणन अंतर्गत-** रेफर वाहन खरेदी करणे इतर सामूहिक शेतमाल वाहतुकीच्या सन्मान करणे इत्यादी .
- **सामूहिक पशुधन व्यवस्थापना अंतर्गत-** सामूहिक गोठा बांधकाम करणे जणावरांच्या मुक्त संचारासाठी जागा ठेवणे,स्लरी युनीट , गांडूळ शेड निर्माण, कॅम्पोस युनिट निर्माण . एकूण अनुदानाच्या ७५%रक्कम सामूहिक कामाच्या बाबींवर व २५%रक्कम वैयक्तिक स्वरूपाच्या लाभाच्या बाबींवर खर्च करिता येईल.
- या योजनेत झालेल्या खर्चावर एकूण अनुदान ६०% देय राहील .

Agri Schemes_PDF (2).pdf - Adobe Reader

## • राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान :-

१) या योजनेअंतर्गत शेतकरी गटासाठी **मिनी दालमिल** ५०% अनुदान, रुपये १.२५ लाख किमान .

२) शेतकरी उत्पादक **गटासाठी गोदान बांधकाम** ५०% टक्के, उच्चतम रु. १२.५० लाख प्रती प्रमाणे अनुदान देय.

३) शेतकरी उत्पादक गटासाठी **बीज प्रक्रिया उद्योग** उभारणीच्या खर्चाच्या ५०% उच्चतम रु. १०.०० लाख प्रति संच अनुदान देय आहे.

४) फ्लेक्झी फंड अंतर्गत **तुषार संच** ५०% टक्के किंवा उच्चतम रु. १००००/- प्रति हेक्टर अनुदान देय

५) पंप संचाच्या ५०% किंवा उच्चतम प्रति संच रु. १००००/- अनुदान देय.

६) **सुधारित कृषी अवजारे अंतर्गत -** ड्रम सीडर, पेरणीयंत्र ,बहुपिक मळणीयंत्र, खत पेरणी यंत्र, रिज फॅरो प्लांटर, पॉवर विडर, रोतटावेटर, भात गहू कापनि यंत्र, स्वयंचलित भात लावणी यंत्र, पॉवर टिलर.

- **मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना :-**

सन २०१७-१८ पासून ५ वर्षांकरिता प्रस्तावित आहे.

- शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित फलोत्पादन खात्यांना व तेलबिया इत्यादी शेताला करता अन्न प्रक्रिया प्रकल्प स्थापित करता येतील.
- फळे भाजीपाला यांसारख्या नाशवंत शेतमालाच्या प्रक्रिया प्रकल्पास प्राधान्य
- अन्न प्रक्रिया प्रकल्पांशी निगडीत पूर्व प्रक्रिया केंद्र (integrated)शीतसाखळी निर्मितीच्या प्रकल्पास अनुदान देणे अंतर्भूत.
- CFTRI, NIFTEM,Agri University मार्फत प्रशिक्षण/ प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मिती.

- **पात्र उद्योग :-** फळे भाजीपाला अन्नधान्य कडधान्य तेलबिया यावर आधारित सक्षम शेतकरी उत्पादक कंपनी गट ,महिला  गट, खासगी उद्योग क्षेत्र ,ग्रामीण बेरोजगार युवक ,सहकारी संस्था यांना प्राधान्य देण्यात येईल.
- **आर्थिक सहाय्य :-** कारखाना व यंत्र आणि प्रक्रिया प्रकल्प यासाठी अत्यावशक दालने त्यांच्या बांधकाम खर्चाच्या ३०% टक्के अनुदान कमाल रु. ५० लाख.
- अनुदान क्रेडिट लिंक्ड बँक एंडेड सर्जरी तत्त्वावर दोन समान वार्षिक  हप्तात मिळेल. ते प्रकल्प पूर्ततेनंतर व पूर्ण क्षमतेने उत्पादनात आल्यानंतर देण्यात येईल .

# इतर योजना

१) डेअरी उद्योजकता विकास कार्यक्रम - नाबार्ड
२) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळ
३) पोकरा प्रकल्प
४) नॅब किसान फायनान्स
५) मॅगनेट प्रकल्प
६) कॉपशॉप प्रकल्प
७) गटशेती योजना
८) राष्ट्रीय कृषि विकास योजना PPP-IAD
९) अपेडा योजना
१०) नॅशनल हॉर्टिक्लचर मिशन NHM

# Thank you
# धन्यवाद